# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

नियामक मंडळाची आठवी बैठक दिनांक १०/४/९७ रोजी मा. उपमुख्यमंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष, महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे झाली. सदर बैठकीत खालील ठरावांना मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ८/१**

'ठराव करण्यात येतो की, सातव्या बैठकीमध्ये मंजूर झालेले ठराव वाचून कायम करण्यात येत आहेत'

**ठराव क्रमांक ८/२**

'ठराव करण्यात येतो की,

अ) भूसंपादन व पुनर्वसनाची कामे त्वरेने होण्यासाठी आयुक्त, पुणे यांना निरीक्षण वाहने, मोजणीसाठी कर्मचारी, कार्यालयीन सुविधा इ. सोई सवलती महामंडळामार्फत देण्यास व त्यासाठी खालीलप्रमाणे होणारा खर्च रु. ७१७ लक्ष पैकी अनुक्रमांक १ मधील २४ निरीक्षण वाहने खरेदी करणे (रु. १०८.०० लक्ष ) व अनुक्रमांक ४ मधील वाहनांची देखभाल व दुरुस्तीचा रु. ४५० लक्ष असे रु. ५५८ लक्ष वगळता रु. १५९.०० लक्ष खर्च महामंडळामार्फत करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**तपशील**

१) २४ निरीक्षण वाहने, २५ टंकलेखन यंत्रे व २४ झेरॉक्स् मशीन यांची खरेदी

| | | | |
|---|---|---|---|
| अ. निरीक्षण वहाने - २४ | रु. | १०८.०० | |
| ब. टंकलेखन यंत्रे - २५ | रु. | १.७५ | |
| क. फोटो कॉपियर - २४ | रु. | २४.०० | |
| ड. आकस्मिक खर्च | रु. | २.५० | |
| इ. लेखन सामग्री | रु. | २.५० | |
| फ. दूरध्वनी | रु. | २.४० | |
| एकूण | रु. | १४०.१५ | ... रुपये १४०.१५ लक्ष |

| | |
|---|---|
| २) ९० भूकरमापक व त्यांचेसाठी मजूर व इतर आस्थापना यांचा १ वर्षाचा खर्च | ... रुपये १११.२४ लक्ष |
| ३) भूसंपादन संयुक्त मोजणी साठी साहित्य व स्टेशनरी याचा खर्च | ... रुपये १५.४२ लक्ष |
| ४) वाहनांची देखभाल व दुरुस्ती तसेच इतर खर्च येत्या ३ वर्षासाठी सुमारे | ... रुपये ४५०.०० लक्ष |
| एकूण | ... रुपये ७१६.८१ लक्ष |
| | समजा ७१७.०० लक्ष |
| | वजा (-) ५५८.०० लक्ष |
| | १५९.०० लक्ष |

मा. पो. मा. ह्रे ५/५ २३.५.९७

मा. उपमुख्यमंत्री ( पाटबंधारे ) व अध्यक्ष,
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे

कार्यकारी संचालक,
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे

ब) वरील खर्चापैकी २४ निरीक्षण वाहनांची खरेदी व त्यासाठी देखभाल व दुरुस्तीचा खर्च महामंडळाच्या पूर्व परवानगी खेरीज करण्यात येऊ नये.

क) महसूल खात्याने सध्या निरीक्षण वाहने भाडयाने घेऊन त्याची देयके महामंडळाने देण्यास तत्वतः मान्यता देण्यांत येत आहे. हया खर्चाचे अंदाजपत्रक नियामक मंडळाकडून पुढील बैठकीत मान्य करुन घ्यावे

**ठराव क्रमांक ८/३**

'ठराव करण्यात येतो की, खालील चार प्रकल्पांच्या सुधारीत अंदाजपत्रकास नियामक मंडळ सुधारित प्रशासकीय मान्यता देत आहे'

| प्रकल्पाचे नांव | सुधारित प्रशासकिय किमंत ( रु. लक्ष ) |
|---|---|
| १. कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प, जिल्हा सांगली | १३२११२.०० |
| २. जांभळी लघु पाटबंधारे तलाव, ता. वाई, जि. सातारा | २०६.९४ |
| ३. ओळवण लघु पाटबंधारे तलाव,ता.गडहिंग्लज,जि. कोल्हापूर | ३१७.२७ |
| ४. तेरणी लघु पाटबंधारे तलाव, ता.गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | ४५५.९२ |

**ठराव क्रमांक ८/४**

'ठराव करण्यात येतो की, ठराव क्रमांक ३/४ नुसार कार्यकारी संचालक यांना अतिरिक्त निधी गुंतवणूकीचे दिलेल्या अधिकारानुसार, कार्यकारी संचालक यांनी 'सिडको' आय. डी. बी. आय. बँका व शासनाकडे केलेल्या गुंतवणूकीस नियामक मंडळ मान्यता देत आहे '

**ठराव क्रमांक ८/५**

'ठराव करण्यात येतो की, नवीन मुठा उजव्या कालव्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक रु. ३० कोटी अंदाजित खर्चाचा तपशिल, या अनुषंगाने पूर्वी केलेल्या खर्चाच्या सविस्तर माहितीसह नियामक मंडळास सादर करुन, सदर कालव्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रु. ३० कोटीची तरतूद करण्याचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. तसेच त्यापैकी तांतडीच्या दुरुस्तीसाठी रु. २.२१ कोटीच्या कामाच्या मान्यतेबाबत पुण्यातील महामंडळाचे सदस्य श्री. गिरीश बापट, विसस व सदस्य यांनी कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांच्या समवेत किमी. ० ते ११ या कालव्यातील प्रस्तावित कामाची पहाणी करुन आवश्यकता तपासून पाहून मान्यता देण्याबाबत विचार करण्याचे ठरले.

मा. उपमुख्यमंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे

कार्यकारी संचालक,
म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे

ठराव क्रमांक ८/६

'ठराव करण्यात येतो की, महसूल खात्यास पिण्याच्या पाणी पुरवठयासाठी महामंडळाकडील ' वॉटर टँकर्स ' शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार उपलब्ध करुन देण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे'

**ठराव क्रमांक ८/७**

'ठराव करण्यात येतो की, १९९७-९८ या आर्थिक वर्षाच्या रु. २१२४२१.८७ लक्ष रुपयांच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास नियामक मंडळ मान्यता देत आहे '

**मा. उपमुख्यमंत्री ( पाटबंधारे ) व अध्यक्ष,**
**म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे**

**कार्यकारी संचालक,**
**म. कृ. खो. वि. महामंडळ, पुणे**